# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 25 February 2026
Time 18.00 to 18.10
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २५ फेब्रुवारी २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- आयुष उपचार पद्धतींना जगभरात मान्यता मिळत असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन; शेगाव इथं राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याचं उद्घाटन
- राज्यातल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात जुलै २०२५ पासून तीन टक्के वाढ
- ऑनलाईन गेमिंगबाबत कृती दल स्थापन केल्याची सरकारची विधानसभेत माहिती
- रोजगार हमी योजनेतल्या कोणत्याही रोजगार सेवकाला कामावरून कमी केलं जाणार नाही, मंत्री भरत गोगावले यांचं स्पष्टीकरण

आणि

- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शिक्षक प्रवर्गाच्या ७३ जागांसाठी नव्याने भरती प्रक्रिया राबवण्यात येणार

****

आयुष प्रणालींचं योगदान मोठं असून, आज जगभर या उपचार पद्धतींना मान्यता मिळत असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. बुलढाणा जिल्ह्यात शेगाव इथं आयोजित राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याचं उद्घाटन केल्यानंतर त्या बोलत होत्या. आयुष उपचार पद्धतींना प्रोत्साहन दिल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारते तसंच पर्यावरण रक्षणालाही हातभार लागतो, असं त्यांनी सांगितलं. आयुष उपचार पद्धतींचे फायदे आणि त्यांच्या प्रचार प्रसारासाठी सरकारकडून होत असलेल्या विविध प्रयत्नांची राष्ट्रपतींनी माहिती दिली. त्या म्हणाल्या –

**बाईट – राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू**

योगाभ्यासाची वाढती लोकप्रियता आणि आयुष प्रणालींच्या प्रसारासाठी सरकार करत असलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विश्वासार्ह आणि प्रभावी उपचारपद्धती जगाला उपलब्ध होत असल्याचं राष्ट्रपतींनी अधोरेखित केलं.
या कार्यक्रमाला राज्यपाल आचार्य देवव्रत, आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे तसंच आयुष मंत्रालयाचे सचिव राजेश कोटेचा उपस्थित होते. आयुर्वेद सेवाव्रतींचा गौरव यावेळी करण्यात आला.
राज्यपालांनी, छोट्या छोट्या दुखण्यांसाठी घरगुती उपचार पद्धतीचा अवलंब करण्याचा तसंच व्यायामाचा सल्ला दिला. तर आयुष पर्यटनावर भर देण्याची गरज प्रतापराव जाधव यांनी यावेळी व्यक्त केली.
या चार दिवस चालणाऱ्या या आरोग्य मेळ्यात आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी उपचार पद्धतीतला मोफत वैद्यकीय सल्ला, तपासण्या आणि औषधं उपलब्ध करून दिली जाणार आहेत. मेळाव्यापूर्वी राष्ट्रपती मुर्मू यांनी शेगाव इथं संत श्री गजानन महाराज समाधीचं दर्शन घेतलं.
या कार्यक्रमानंतर राष्ट्रपती मुर्मू नागपूरला पोहोचल्या असून, “एकता आणि विश्वासातून महाराष्ट्राचे सुवर्णयुग” या, ब्रह्माकुमारीज संस्थेच्या राज्यस्तरीय अभियानाचा शुभारंभ त्यांच्या हस्ते होत आहे.

****

राज्यातल्या शासकीय आणि इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात जुलै २०२५ पासून तीन टक्के वाढ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी आज विधानपरिषदेत ही घोषणा केली. हा महागाई भत्ता आता ५५ वरून ५८ टक्के होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. याचा फायदा पाच लाख १६ हजार कार्यरत कर्मचाऱ्यांना, तर आठ लाख ७२ हजार निवृत्त कर्मचाऱ्यांना होईल, अशी माहिती जैस्वाल यांनी दिली. फेब्रुवारी २०२६ पासून हा निर्णय लागू होईल, जुलै ते ऑक्टोबर २०२५ ची थकबाकी गुढीपाडव्यानिमित्त मार्च २०२६ मध्ये दिली जाईल, तर नोव्हेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ च्या थकबाकीबाबत वेगळा आदेश निर्गमित केला जाईल, असं त्यांनी सांगितलं.

****

विधानसभेत आज राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावर चर्चा पुढे सुरु झाली. यावर बोलताना काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी, राज्यातल्या कायदा

आणि सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे, शाळा बंद पडत आहेत, पण यातला एकही मुद्दा राज्यपालांच्या अभिभाषणात आला नाही अशी टीका केली. आश्वासन देऊनही शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली नाही, सरकार केवळ घोषणाबाजी करत आहे असं वडेट्टीवार म्हणाले.

राज्यात बेरोजगारीत वाढ होत असून, देशाच्या अर्थव्यवस्थेत राज्याचा वाटा कमी होत असल्याचं राज्यपालांनी कबूल केल्याचं, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यावेळी म्हणाले.

शिवसेना आमदार निलेश राणे आणि काँग्रेस नेते अमिन पटेल यांनी राज्यात अंमली पदार्थांचा प्रश्न गंभीर बनल्याचं सांगितलं. शेखर निकम, विनय कोरे यांनीही चर्चेत सहभाग घेतला.

****

ऑनलाईन गेमिंगबाबत सरकार गंभीर असून, त्यासाठी एक कृती दल स्थापन केल्याची माहिती, माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी आज विधानसभेत दिली. ऑनलाईन गेम्स आणि मोबाईलच्या व्यसनामुळे बालकांचं मानसिक, शैक्षणिक, सामाजिक आरोग्य धोक्यात आल्यासंदर्भात आमदार निरंजन डावखरे आणि संजय केणेकर यांनी लक्षवेधी सूचना मांडल्या. पालकांना digital literacy आणि बालकांना digital diet गरजेचं असल्याचं शेलार यांनी नमूद केलं.

****

रोजगार हमी योजनेतल्या कोणत्याही रोजगार सेवकाला कामावरून कमी केलं जाणार नाही, असं मंत्री भरत गोगावले यांनी आज विधानसभेत स्पष्ट केलं. मागणीनुसार काम देण्याचं धोरण कायम राहील आणि कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही, असं ते म्हणाले.

रोजगार हमी योजना आणि घरकुल योजना यासंदर्भातल्या निधीसंदर्भात मंत्र्यांनी दिलेल्या उत्तरांवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नाराजी व्यक्त केली. यासंदर्भात पाठपुरावा करुन अधिवेशन काळात माहिती सभागृहासमोर ठेवण्याची सूचना त्यांनी केली.

****

मासिक पाळीच्या काळात महिलांना रजा मिळण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निर्देशानुसार एक समिती नेमण्यात येईल आणि त्यानुसार निर्णय घेतला

जाईल असं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज विधानसभेत सांगितलं. जितेंद्र आव्हाड यांनी याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. स्त्री भ्रूणहत्या विरोधी कायद्यातल्या त्रुटी दूर करुन ते कठोर करण्यासाठी चर्चा करून निर्णय घेतला जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं.

****

महिलांमध्ये होणाऱ्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगावरची एचपीव्ही लस आता मोफत करण्यात आली आहे. महिलांच्या आरोग्य सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत केंद्र सरकारनं देशभरातल्या १४ वर्षांखालील मुलींना मोफत लसीकरण कार्यक्रमास मंजुरी दिली आहे. सरकारी रुग्णालयं, जिल्हा रुग्णालयं, समुदाय आरोग्य केंद्रं आणि आयुष्मान आरोग्य मंदिरांत ही लस उपलब्ध होणार आहे. धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी लोकसभेत खाजगी विधेयक सादर करुन राष्ट्रीय स्तरावर ही लस मोफत उपलब्ध करून द्यावी अशी मागणी केली होती. या निर्णयामुळे देशातल्या एक कोटी २५ लाख मुलींना सुरक्षित आरोग्य संरक्षण उपलब्ध होणार आहे.

****

राज्य परिवहन महामंडळाच्या ८६ हजार कर्मचाऱ्यांना फेब्रुवारी महिन्याचा थकीत वेतनवाढीचा हप्ता देण्यात आला आहे. महामंडळानं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात ही माहिती देण्यात आली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडे २१० कोटी रुपयांची मागणी केली होती. त्यांच्या पाठपुराव्यानंतर १०० कोटी रुपयांचा निधी तत्काळ उपलब्ध झाला. उर्वरित रक्कमही लवकरच प्राप्त होणार असल्याचं एस टी महामंडळानं सांगितलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शिक्षक प्रवर्गाच्या ७३ जागांसाठी राज्य शासनाच्या नवीन नियमावली, कार्यपद्धतीप्रमाणे भरती प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. यापूर्वी अर्ज केलेल्यांना नव्याने ‘एटीआर’ भरावा लागणार असून, नवीन उमेदवारांना देखील अर्ज दाखल करता येईल, अशी माहिती कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर यांनी दिली. यामध्ये प्राध्यापक प्रवर्गातल्या आठ तर सहयोगी प्राध्यापक पदाच्या १२ जागांचा समावेश आहे. तर सहाय्यक प्राध्यापकांच्या ५३ जागांसाठी ही भरती प्रक्रिया राबवण्यात

येणार आहे. या जागांसाठी केंद्र शासनाच्या समर्थ पोर्टलच्या माध्यमातून २६ फेब्रुवारी ते १२ मार्च पर्यंत ऑनलाईन अर्ज करता येणार आहे.

****

बीड जिल्ह्यात परवा २३ तारखेला झालेल्या अवकाळी पावसामुळे विविध भागांतल्या शेतीपिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं असून, नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे त्वरित करण्यात यावेत, अशी मागणी खासदार बजरंग सोनवणे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना मागणीचं निवेदन सादर केलं.

****

दरम्यान, लोकसभा सचिवालयाच्या वतीने भारत–उझबेकिस्तान संसदीय मैत्री गटाची १८ व्या लोकसभेसाठी स्थापना करण्यात आली असून, या गटात खसदार बजरंग सोनवणे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

****

बुलढाणा जिल्ह्यात लोणार इथल्या खाऱ्या पाण्याच्या सरोवरात अचानक गोडं पाणी जाऊन पाणी पातळीत मोठी वाढ होत असून, प्रशासनाने याबाबत उपाययोजना करण्याची मागणी करत नागरीकांनी साखळी उपोषण सुरु केलं आहे. पाणी पातळी वाढत असल्यामुळे सरोवर परिसरात असलेल्या कळमजा देवीच्या मंदिरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचलं असून, नियमित दर्शनारिता येणाऱ्या भक्तांसाठी मंदिर पाण्यामुळे बंद झाल्याची तक्रारही नागरीकांनी केली आहे.

****